# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २४० /२०२५ — दि.०७/११/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत एम.एम.आर.डी.ए. कडुन ठाणे घोडबंदर वाहिनीवर मुल्लाबाग बस स्टॉप ते पातलीपाडा ब्रिज पावेतो सर्व्हिसरोड मर्ज काम चालु असल्याने त्या ठिकाणी पिक हॉवर्स मध्ये वाहतुक कोंडी होते. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील प्रमाणे **वाहतुकीत बदल** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** निलकंठ ग्रिन, मुल्लाबाग कडनु घोडबंदर कडे व ठाणे कडुन मुल्लाबाग बस डेपो मार्गे निलकंठ ग्रिन कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **मुल्लाबाग बस डेपो कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे |
| **पर्यायी मार्ग –** | **अ)** निलकंठ ग्रिन मुल्लाबाग कडुन घोडबंदर कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने हॅपी व्हॅली सर्कल, मानपाडा जक्शन येथुन इच्छित स्थळी जातील.<br>**ब)** ठाणे कडुन मुल्लाबाग बस डेपो मार्गे निलकंठ ग्रिन कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही मानपाडा जंक्शन, हॅपी व्हॅली सर्कल येथुन इच्छित स्थळी जातील. |

**सदर वाहतूक अधिसूचना दिनांक ०४/११/२०२५ रोजी पासुन मुल्लाबाग येथील सर्व्हिसरोड मर्जचे काम संपे पर्यंत अंमलात राहील.**

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
**पोलीस उप आयुक्त,**
**वाहतूक विभाग, ठाणे शहर**

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, वागळे व प्रभारी अधिकारी, कासारवडवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.